# राजदूत



नितळ गौरवर्णी होता तो....
त्याचा रेखीव पणा पाहून कोणीही
त्याच्या प्रेमात पूर्णत: विरघळून जाईल.....
उंची तशी लहानच होती.
किर्ती मात्र सर्वत्र होती..
कापसालाही लाजवेल अशी
मऊशार कांती होती..
त्याचं लुकलुकीत चमकणारं तेज पाहून
नजरेचं समाधान होत नव्हतं
हिरव्यागार गालिच्यावर तो
स्थिर पणे आसनस्थ झाला होता.
त्याच्या मस्तकावर केशरी तुरा रोवल्या गेला
त्याच मनोहारी रुप व्दिगुणीत झालं.....
आता मात्र मनाला आवरणं कठिण झालं--
मदतीला कर धावून आले...
त्यांनी त्याला मधोमध फोडले.
आता आस्वादाचा मोह आवरता आवरत नव्हता..
त्याला मध्यभागी तुपाचा अभिषेक करण्यात आला--
ती धार क्षणार्धात त्याच्या चरणाशी विसावली...
गुळ, खोबरं खसखशीचे एकजीव सारण त्या
तुपात सहज एकरुप झालं...
त्याचा सुगंध आसमंतात दरवळू लागला...
आणि--- एका क्षणात तो घास घेताच्चं
सारे क्षण स्तब्ध झाले.



त्याची अनुभूती म्हणजे ब्रम्हानंद होता...
जितका मोहक तितकाच सात्विक...
कोण होता तो... नक्की कोण होता तो...
मनाला भारावून टाकणारा, मराठमोळ्या खाद्य संस्कृतीचा
'राजदूत'... बाप्पाचा सर्वात लाडका 'उकडीचा मोदक' होता तो.

अर्चना वैद्य पुणे